दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com

Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ बुधवार, दि. १० जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ५१ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


### विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळ कशासाठी?

उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्याचे वेध लागले असतानाच, शिक्षण संचालनालयाने ९ जून रोजी जारी केलेले परिपत्रक म्हणजे प्रशासकीय गोंधळाचा आणि विदर्भातील वास्तवाकडे डोळेझाक करण्याचा एक उत्तम नमुना आहे. कडक उन्हाचा दाखला देत विदर्भातील शाळा १५ जूनऐवजी २२ जून रोजी सुरू करण्याचा निर्णय घेण्यात...

---> अग्रलेख - पान 2 वर

### शिर्डीत आरोग्याशी खेळ? विकला जातोय बुरशी लागलेला प्रसाद

**शिर्डी :** साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या हजारो भाविकांची प्रसादाच्या नावाखाली सर्रास फसवणूक केली जातेय. मंदिर परिसरातील खासगी दुकानांमध्ये चक्क बुरशी लागलेले आणि कडक झालेले पेढे विकले जात असल्याचा आरोप भाविकांनी केलाय. त्यातच साम टिव्हीनं जेव्हा या खासगी विक्रेत्यांच्या दुकानावर भेट दिली तेव्हा धक्कादायक माहिती समोर आलीय. या पेढ्यांच्या बॉक्सवर ना एक्सपायरी डेट होती.ना हे पेढे नेमके कुठे बनवले याचा पत्ता..त्यामुळे श्रद्धेच्या नावाखाली नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरु असल्याचा प्रकार समोर आलाय.

# जिल्हा बँक निवडणूक – अर्ज छाननीत अनेक दिग्गजांचे अर्ज बाद

**छत्रपती संभाजीनगर :** दि औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदाच्या निवडणुकीत अर्ज छाननीत ४५ उमेदवारांचे अर्ज बाद ठरले. तर ११३ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. उमेदवारी अर्ज बाद ठरलेल्यांमध्ये शिवसेना आमदार रंजना जाधव, अब्दुल सत्तार यांचे पुत्र समीर सत्तार, माजी आमदार अण्णासाहेब माने, अर्चना पाटील, इंदुमती पाटील आदींचा समावेश आहे. दरम्यान, अर्ज बाद ठरलेल्यांना गुरुवारपर्यंत (११ जुन) विभागीय सह निबंधकांकडे अपील करता येते, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी समृत जाधव यांनी दिली.

जिल्हा सहकारी बँकेचा निवडणूक कार्यक्रम एक जून रोजी प्रसिद्ध झाला. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम मुदतअखेर( शुक्रवार) १५८ इच्छुकांनी एकूण २१४ उमेदवारी अर्ज दखल केले. तर सोमवारी सकाळी दहा वाजता अर्जांची छाननी प्रक्रिया सुरु झाली. याच दरम्यान, पालकमंत्री संजय शिरसाट, खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार संजना जाधव, रमेश बोरनारे, समीर सत्तार यांच्यासह १४ जणांच्या अर्जांवर आक्षेप नोंदविण्यात आले. त्यावरील सुनावणी सायंकाळी उशीरा संपली. त्यानंतर पहाटेपर्यंत छाननी व पुढील कार्यवाही सुरु होती.

तर मंगळवारी सकाळी अकरा वाजेच्या सुमारास निवडणुक निर्णय अधिकारी समृत जाधव यांनी विधीग्राह्य नामनिर्देशपत्राची यादी प्रसिद्ध केली. यात ४५ उमेदवारांचे अर्ज बाद ठरले. तर ११३ उमेदवारांचे अर्ज वैध ठरल्याची माहिती त्यांनी दिली. विशेष म्हणजे, ज्या १४ जणांच्या अर्जांवर आक्षेप घेण्यात आला होता. त्यापैकी तीन जणांचे अर्ज काही ना काही त्रुटीमुळे अवैध ठरल्याचे समोर आले. दरम्यान, शासकीय सुट्टी वगळून येत्या २३ जून रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत देण्यात आली आहे. तर ४ जुलै रोजी मतदान होणार आहे.

**यांचे अर्ज ठरले बाद -:** आमदार रंजना जाधव यांनी प्राथमिक कृषी पतपुरवठा सेवा सहकार संस्था कन्नड मतदारसंघातून अर्ज दाखल केला होता. परंतु प्रतिनिधीत्व करणाऱ्या संबंधित संस्थेच्या दोन वर्षाआधीच्या त्या सभासद नसल्योचे समोर आल्याने त्यांचा अर्ज हा बाद ठरल्याचे निवडणूक अधिकाऱ्यानी नमूद केले. तर कृषी पणन संस्था व शेतमालल प्रक्रिया संस्था मतदारसंघातून अर्ज दाखल करणारे समीर सत्तार यांचा ही अर्ज बाद ठरला. सोयगाव येथे त्यांच्या मालकीच्या इमारतीत जिल्हा बँकेची शाखा ही किरायाने असल्याची बाब छाननीत समोर आल्याचे अधिकाऱ्यांनी नमूद केले. तर माजी आमदार अण्णासाहेब माने, इंदूमती साहेबराव पाटील यांचे अर्ज बाद ठरले. ते ज्या संस्थेचे प्रतिनिधीत्व करतात, ती संस्था लेखापरिक्षणात वर्ग क मध्ये आहे. यासह रुपचंद गाडेकर, काकासाहेब फरकाडे, सुवर्णा संजय जाधव, अर्चना नितीन पाटील यांच्यासह जणांचे अर्ज बाद ठरल्याचे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सांगितले.

**असेही चित्र - :** आमदार अनुराधा चव्हाण यांचा प्राथमिक कृषी पतपुरवठा विकास सेवा सहकारी संस्था फुलंब्री मतदारसंघातून दाखल अर्ज बाद ठरला तर महिला प्रतिनिधी मतदारसंघातून त्यांचा अर्ज वैध ठरला. तर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा देवयानी कृष्णा पाटील यांचा बिगर शेती संस्था व महिला प्रतिनिधी अशा दोन्ही मतदारसंघातील अर्ज वैध ठरले. सुहास सिरसाठ यांचा इतर मागासवर्गीय सदस्य मतदारसंघातील अर्ज बाद झाला. तर प्राथमिक कृषी पतपुरवठा विकास सेवा सहकारी संस्था फुलंब्री मतदारसंघातून दाखल अर्ज वैध ठरला. तर प्राथमिक कृषी पतपुरवठा विकास सेवा सहकारी संस्था पैठणमधून आमदार विलास भुमरे यांचाच एकमेव अर्ज दाखल होता. तो वैध ठरल्याने त्यांच्यासाठी ही निवडणूक केवळ औपचारिकता राहिली आहे. तर वैयक्तिक सभासद मतदारसंघातून आलेला एकमेव अर्ज देखील बाद झाला आहे.

**११३ उमेदवारांचे अर्ज ठरले वैध :** पालकमंत्री संजय शिरसाट, ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे, खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार अंबादास दानवे, विलास भुमरे, रमेश बोरनारे, अनुराधा चव्हाण, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष अर्जुन गाढे यांच्यासह ११३ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले.

# गुटखा माफियांचा छत्रपती संभाजीनगरमध्ये FDA पथकावर जीवघेणा हल्ला; महिला अधिकाऱ्याला चिरडण्याचा प्रयत्न

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी:** जिल्ह्यात गुटखा आणि प्रतिबंधित अन्नपदार्थांची तस्करी करणाऱ्या माफियांनी आता थेट शासकीय अधिकाऱ्यांवरच हात टाकण्यास सुरुवात केली आहे. गंगापूर तालुक्यातील रहिमपूर येथे प्रतिबंधित गुटख्यावर कारवाई करण्यासाठी गेलेल्या अन्न व औषध प्रशासन (FDA) च्या पथकावर गुटखा तस्करांनी जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना आज पहाटे घडली. तस्करांनी थेट महिला अन्न सुरक्षा अधिकाऱ्याच्या अंगावर काळी स्कॉर्पिओ गाडी घालून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला आणि 'गोळ्या घाला' अशी धमकी देत अधिकाऱ्यांच्या ताब्यात असलेला गुटख्याचा टेम्पो जबरदस्तीने पळवून नेला. या प्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती प्रज्ञा प्रमोद सुरसे यांनी वाळूज पोलीस ठाण्यात अधिकृत फिर्याद दिली असून, पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून दोन आरोपींना मुसक्या आवळल्या आहेत. अन्न सुरक्षा अधिकारी घटनास्थळी टेम्पो ताब्यात घेऊन थांबलेले असताना, काही संशयास्पद वाहने त्यांच्या अवतीभवती चकरा मारत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. यामध्ये रॉयल एनफिल्ड बुलेट (MH.20.GH.8240) वरून दोन इसम सातत्याने घिरट्या घालत अधिकाऱ्यांची माहिती कोणालातरी फोनवर देत होते. याशिवाय दुसरी दुचाकी (MH.20.BZ.6094), एक पांढऱ्या रंगाची क्रेटा कार (MH.20.GV.9408) आणि एक किया कार (MH.57.0816) देखील तिथे रेकी करत होत्या. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून प्रज्ञा सुरसे यांनी तात्काळ वाळूज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिवचरण पांढरे यांना फोन करून तातडीने पोलीस बंदोबस्त पाठवण्याची विनंती केली.

### "गोळ्या घाला रे..."; महिला अधिकाऱ्याला चिरडण्याचा प्रयत्न

**पोलीस मदत पोहोचण्यापूर्वीच, तिथे अचानक एका काळ्या रंगाची स्कॉर्पिओ गाडी वेगाने आली. त्यातून उतरलेल्या गुंडांनी आरडाओरडा करत अधिकाऱ्यांना घेरले. "गोळ्या घाला रे गोळ्या घाला," अशा धमक्या देत ते अधिकाऱ्यांच्या अंगावर धावून आले. या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे आणि गुंडांच्या हातात हत्यारे असण्याच्या भीतीने पथकातील तिन्ही पुरुष अधिकारी वेगवेगळ्या दिशेने पळाले. या धावपळीत महिला अधिकारी श्रीमती प्रज्ञा सुरसे यांना वेगाने पळता आले नाही. हीच संधी साधून स्कॉर्पिओ चालकाने थेट सुरसे यांच्या अंगावर गाडी घालून त्यांना चिरडण्याचा आणि जीवे मारण्याचा प्रयत्न केला. सुरसे यांनी अत्यंत चपळाईने स्वतःला बाजूला झोकून दिल्यामुळे त्यांचे प्राण थोडक्यात वाचले. या गोंधळाचा फायदा घेऊन आरोपींनी त्यांच्यासोबत आणलेल्या एका चालकाला आयशर टेम्पोत बसवले आणि गुटख्याने भरलेला टेम्पो, स्कॉर्पिओ व इतर वाहनांसह सर्व आरोपी अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले.**

### गुप्त माहितीच्या आधारे मध्यरात्री छापा

**सह आयुक्त (अन्न) यांच्या आदेशान्वये अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती प्रज्ञा सुरसे, सहायक आयुक्त विवेक पाटील, अधिकारी फरिद सिद्दीकी आणि अमोल कांबळे यांचे पथक ८ जून रोजी रात्रीच्या सुमारास वैजापूर परिसरात कारवाई करत होते. यादरम्मत पथकाला गुप्त बातमीदाराकडून अत्यंत गोपनीय माहिती मिळाली की, गंगापूर तालुक्यातील रहिमपूर येथील 'मे. जी.के. रोलर फ्लोअर मिल' समोर प्रतिबंधित गुटख्याने भरलेला एक आयशर टेम्पो उभा आहे. या माहितीच्या आधारे पथकाने ९ जून रोजी पहाटे ठीक ०१.१५ वाजता सदर ठिकाणी छापा टाकला. तेथे MH.16.CD.8296 क्रमांकाचा आयशर टेम्पो उभा असलेला आढळला. अधिकाऱ्यांनी तपासणी केली असता, त्यात प्रतिबंधित अन्नपदार्थांची (गुटखा व पानमसाला) तब्बल २५ ते ३० मोठी पोती आढळून आली. पथकाने तात्काळ हा टेम्पो आपल्या ताब्यात घेतला.**

या घटनेनंतर घाबरलेल्या शासकीय पथकाने वाळूज पोलीस ठाणे गाठून आपबिती सांगितली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. अधिकाऱ्यांनी काढलेले फोटो, व्हिडिओ आणि गुप्त बातमीदारांनी दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी शोधमोहीम राबवून रेकी करणाऱ्या बुलेटसह दोन मुख्य आरोपींना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे सुनील जयराम ढोले आणि सागर रामकिसन झळके अशी आहेत. तर प्रभाकर सोळुंके, नजीर शेख, दत्ता सुभाष पाटेकर, सद्दाम शेख, गायकवाड आणि त्यांचे इतर साथीदार सध्या फरार असून पोलीस त्यांचा कसून शोध घेत आहेत.

वाळूज पोलिसांनी या प्रकरणी CR No. 239/26 अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या (BNS) कलम १०९(१) (जीवे मारण्याचा प्रयत्न करणे), कलम १३२ (सरकारी कर्मचाऱ्याला कर्तव्यापासून रोखण्यासाठी हल्ला करणे), आणि कलम १८९(२), १९०, १९१(२) नुसार बेकायदेशीर जमाव जमवून दंगल घडवणे व सरकारी कामात अडथळा आणणे या गंभीर कलमानुसार कारवाई करण्यात आली आहे. या घटनेमुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात शासकीय अधिकाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, गुटखा माफियांवर मोक्काअंतर्गत कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. पुढील तपास वाळूज पोलीस करत आहेत.

## भेटीच्या प्रतीक्षेत युवक, पण दिपकेपर्यंत पोहोचता आले नाही



हिंदू प्रकाश वार्ता, प्रतिनिधी

**वाळूज महानगर :** कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांची भेट घेण्याच्या अपेक्षेने वाळूज महानगरातील त्यांच्या निवासस्थानाबाहेर काही युवक जमा झाले होते. गर्दी मोठी नसली तरी सुमारे आठ ते दहा युवक विविध ठिकाणांहून येथे आल्याचे दिसून आले. मात्र पोलिस बंदोबस्त आणि सुरक्षा व्यवस्थेमुळे त्यांना प्रत्यक्ष भेट घेता आली नाही. उपस्थित युवकांमध्ये हिंगोलीसह मराठवाड्यातील विविध भागांतून आलेले तरुण होते. काहींच्या हातात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र व हारही दिसून आले. दिपके यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची अपेक्षा घेऊन आलेल्या या युवकांनी बराच वेळ परिसरात थांबूनही भेट न झाल्याने नाराजी व्यक्त केली.

"इतक्या दूरवरून आलो, किमान काही मिनिटे भेट मिळेल अशी अपेक्षा होती," अशी प्रतिक्रिया काही युवकांनी दिली. दरम्यान, प्रवेशद्वाराजवळ उपस्थित असलेल्या एका व्यक्तीने, "सध्या सुरक्षा कारणांमुळे सर्वांना भेट देणे शक्य नाही," असे सांगितले.

### "भेट नाही, तरी पाठिंबा कायम"

**उपस्थित काही युवकांनी अभिजीत दिपके यांची भेट झाली नसली तरी त्यांच्या आंदोलनाबाबत आणि युवकांच्या प्रश्नांवरील भूमिकेबाबत आपला पाठिंबा कायम असल्याचे सांगितले.**

## टँकरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**परभणी :** परभणी-गंगाखेड महामार्गावरील भरधाव वेगातील इंधनाच्या टँकरने दुचाकीला पाठीमागून जबरदस्त धडक दिल्याने याबद्दल दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला ही घटना मंगळवार दिनांक 9 जून रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास सिंगणापूर फाट्याजवळ घडली.

माणिक अप्पाराव कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दिगंबर पिराजी कदम वय २५ वर्ष असे मताचे नाव असून दिगंबर कदम हे एम एच 14 ई टी 63 31 या दुचाकीने तिरुपती पेट्रोल पंपा कडून शिंगणापूर कडे जात असताना यावेळी परभणी वरून एम एच 44 74 77 या क्रमांकाच्या इंधनाच्या टँकरने दुचाकीला पाठीमागून जबरदस्त धडक दिल्याने अपघातात गंभीर जखमी होऊन दिगंबर कदम यांचा जागीच मृत्यू झाला घटनास्थळावरून फरार झाला. याप्रकरणी टँकर चालक लहू कुमार धोंडीबापुरी यांच्यावर दैठना पोलिसात पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मुंडे हे करीत आहेत अपघाताची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक. जी जी. सोनेत पोलीस अंमलदार विठ्ठल कुंडगीर आशुतोष जाधव यांनी घटनास्थळी धाव घेतली पंचनामा करून मृतदेह उत्तरे तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालय पाठविण्यात आला..

## 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'चा संदेश धुळीत; अदालत रोड येथील शिल्प प्रशासनाच्या उदासीनतेचे प्रतीक
# सामाजिक संदेश देणाऱ्या प्रतीकांची दयनीय अवस्था, नागरिकांत संताप

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी, सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर, :** मुलींच्या शिक्षणासाठी आणि सक्षमीकरणासाठी 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'च्या घोषणा दिल्या जातात, जनजागृती मोहिमा राबवल्या जातात. मात्र त्याच संदेशाचे प्रतीक असलेले शिल्प आज धूळ, झुडपे आणि प्रशासनाच्या दुर्लक्षाखाली हरवत असल्याचे विदारक चित्र शहरात पाहायला मिळत आहे. अदालत रोडवरून समर्थ नगरकडे जाणाऱ्या मार्गावरील इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) हॉल परिसरात उभारण्यात आलेल्या दोन बालकांच्या अभ्यासरत शिल्पांची अवस्था सध्या अत्यंत दयनीय झाली आहे.





धुळीने माखलेले चेहरे, हातातील पुस्तकांवर साचलेली घाण आणि आजूबाजूला वाढलेल्या झुडपांचा विळखा... मुलींच्या शिक्षणाचा संदेश देणाऱ्या या शिल्पांची सध्याची अवस्था पाहून प्रशासनाच्या देखभाल व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. शहराच्या मध्यवर्ती आणि वर्दळीच्या मार्गावर असलेले हे शिल्प दुर्लक्षामुळे अक्षरशः नजरेआड झाले आहे.

विशेष म्हणजे, शिक्षण, समानता आणि सामाजिक जागृतीचा संदेश देण्यासाठी उभारण्यात आलेल्या या कलाकृती आज स्वतःच उपेक्षेचे बळी ठरत आहेत. समाजाला प्रेरणा देणाऱ्या प्रतीकांवरच दुर्लक्षाची धूळ साचल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. सुशोभीकरणाच्या नावाखाली लाखो रुपये खर्च केले जात असताना अशा सार्वजनिक कलाकृतींच्या देखभालीकडे मात्र सातत्याने दुर्लक्ष होत असल्याची टीका नागरिकांकडून केली जात आहे.

स्थानिकांच्या मते, शहरातील अनेक चौक, उद्याने आणि सार्वजनिक ठिकाणांवरील शिल्पे व स्मारके अशाच अवस्थेत पडून आहेत. उभारणीवर खर्च होतो; मात्र देखभाल आणि संवर्धनासाठी कोणतीही प्रभावी यंत्रणा कार्यरत नसल्याने या कलाकृतींचे अस्तित्व धोक्यात येत आहे.

नागरिकांनी महानगरपालिकेकडे तातडीने या परिसरातील झुडपे हटविणे, शिल्पांची साफसफाई करणे आणि नियमित देखभालीसाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याची मागणी केली आहे. तसेच सामाजिक संदेश देणाऱ्या अशा शिल्पांचे जतन करणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून शहराच्या सांस्कृतिक ओळखीचे जतन करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

'बेटी बचाओ, बेटी पढाओ' हा संदेश केवळ सरकारी फलकांवर आणि जाहिरातींमध्ये झळकून उपयोग नाही. त्या संदेशाचे प्रतिनिधित्व करणारी प्रतीकेही जपली गेली पाहिजेत. अन्यथा धुळीत हरवत चाललेले हे शिल्प प्रशासनाच्या संवेदनाहीनतेची आणि सार्वजनिक संपत्तीबाबतच्या उदासीनतेची मूक साक्ष देत राहील, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

# अपघातमुक्त जिल्ह्यासाठी धडक मोहीम : एकाच दिवसात हजारहून अधिक वाहनचालकांवर कारवाई

**अजिंठा :** छत्रपती संभाजीनगर ग्रामीण जिल्ह्यामध्ये वाढत्या रस्ते अपघातांच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने अत्यंत कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या विशेष वाहतूक अंमलबजावणी मोहिमेत एकाच दिवसात हजारहून अधिक वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व तेवीस पोलीस ठाणे आणि जिल्हा वाहतूक शाखेने या मोहिमेत सक्रिय छटा दाखवत सहभाग घेतला आहे. रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करणे, वाहतुकीला शिस्त लावणे आणि निष्पाप नागरिकांचे प्राण वाचवणे हेच या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी जिल्ह्यातील रस्ते अपघातांच्या आकडेवारीचा सखोल आढावा घेतला असता, बहुतांश प्राणघातक अपघात हे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणे, हेल्मेटचा वापर न करणे, भरधाव वेगाने आणि चुकीच्या बाजूने वाहन चालविणे तसेच स्टंटबाजी व निष्काळजीपणामुळे होत असल्याचे निदर्शनास आले आहे. मागील वर्षभरात जिल्ह्यात शेकडो रस्ते अपघात घडले असून, त्यामध्ये अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत तर शेकडो नागरिक गंभीर जखमी झाले आहेत. यामध्ये सर्वाधिक अपघात दुचाकीस्वारांचे झाले असून अपघातांचे विश्लेषण करताना अनेक प्रकरणांमध्ये हेल्मेटचा वापर न केल्यामुळे डोक्याला गंभीर दुखापत होऊन मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे.





चालू वर्षातही मे महिन्यापर्यंत दुचाकी अपघातांची मालिका अशीच सुरू राहिल्याने ही चिंताजनक परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी या विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

या संपूर्ण जिल्ह्यातील मोहिमेदरम्यान विना हेल्मेट वाहन चालवणे, सिग्नल तोडणे, पोलिसांच्या इशाऱ्यांचे पालन न करणे, विना परवाना वाहन चालवणे, वाहतुकीस अडथळा निर्माण करणे, ट्रिपल सीट जाणे, विना सीट बेल्ट प्रवास करणे आणि ओव्हर स्पीडने वाहन चालविणे अशा विविध कारणांमुळे अनेक वाहनचालकांविरुद्ध मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हे नोंदवून मोठा दंड वसूल करण्यात आला. तसेच वाहन चालवताना मोबाईलवर बोलणे, फॅन्सी नंबर प्लेट वापरणे, धोकादायक पद्धतीने ओव्हरटेक करणे आणि अठरा वर्षांखालील मुलांनी वाहन चालवणे यावरही कडक कारवाई करण्यात आली.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, वाहनचालकांनी हेल्मेटकडे केवळ ओझे किंवा दंडात्मक कारवाईपासून वाचण्याचे साधन म्हणून न पाहता, स्वतःच्या जीवाचे आणि कुटुंबाच्या सुरक्षिततेचे कवच म्हणून पाहावे. प्रत्येक दुचाकीस्वाराने हेल्मेटचा अनिवार्य वापर करावा, वेगमर्यादेचे पालन करावे आणि वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करून पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध पोलीस प्रशासनाची ही कठोर कारवाई यापुढेही अशीच सातत्याने सुरू राहील, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# सं पा द की य

## विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळ कशासाठी?

उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्याचे वेध लागले असतानाच, शिक्षण संचालनालयाने ९ जून रोजी जारी केलेले परिपत्रक म्हणजे प्रशासकीय गोंधळाचा आणि विदर्भातील वास्तवाकडे डोळेझाक करण्याचा एक उत्तम नमुना आहे. कडक उन्हाचा दाखला देत विदर्भातील शाळा १५ जूनऐवजी २२ जून रोजी सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला असला, तरी या केवळ सात दिवसांच्या सवलतीने विदर्भातील उन्हाची तीव्रता कमी होणार आहे का, हा खरा प्रश्न आहे. उर्वरित महाराष्ट्रात १५ जून रोजी शाळा नियमित सुरू होत असताना, विदर्भातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत सरकारने दाखवलेली ही तोंडदेखली सहानुभूती केवळ एका जनहित याचिकेच्या दबावामुळे आली आहे की काय, अशी शंका घेण्यास वाव आहे.

विदर्भातील जून महिन्यातील तापमान किती भयानक असते, याची जाणीव मंत्रालयात वातानुकूलित केबिनमध्ये बसणाऱ्या अधिकाऱ्यांना नसावी. जूनच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत विदर्भात सूर्य आग ओकत असतो. अशा अत्यंत प्रतिकूल हवामानात २२ जूनपासून शाळा सुरू करण्याचा अट्टाहास कशासाठी? त्यात भर म्हणजे २२ जून ते ३० जून या कालावधीत शाळा सकाळच्या सत्रात भरतील आणि जुलैपासून नियमित वेळेत सुरू होतील, असा अजब तोडगा शिक्षण विभागाने काढला आहे. सकाळच्या सत्रात शाळा भरवली तरी दुपारच्या वेळी जेव्हा मुले घरी परततील, तेव्हा बाहेरचे तापमान चाळीस अंशाच्या आसपास असते. अशा परिस्थितीत लहान मुलांच्या आरोग्याला निर्माण होणाऱ्या धोक्याची जबाबदारी शिक्षण आयुक्त किंवा सरकार घेणार का?

शासनाने संपूर्ण राज्यातील राज्य मंडळाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या उन्हाळी सुट्ट्यांमध्ये एकवाक्यता आणि सुसंगती आणण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु, भौगोलिक परिस्थितीचा विचार न करता केवळ कागदोपत्री 'एकवाक्यता' आणण्याच्या नादात विदर्भातील विद्यार्थ्यांवर अन्याय केला जात आहे. विदर्भात पावसाचे आगमन उशिरा होते आणि उन्हाचा कडाका दीर्घकाळ टिकतो, हे निसर्गाचे साधे नियमही शिक्षण विभागाला समजू नयेत, याचे आश्चर्य वाटते. जोपर्यंत विदर्भात पावसाचे पद्धतशीर आगमन होत नाही आणि वातावरणात गारवा निर्माण होत नाही, तोपर्यंत शाळा पूर्णवेळ सुरू करणे म्हणजे चिमुरड्यांना उन्हाच्या भट्टीत ढकलण्यासारखेच आहे.

एकीकडे विद्यार्थ्यांचे हित आणि आरोग्य जपल्याचा आव आणायचा आणि दुसरीकडे केवळ सात दिवस उशिरा शाळा सुरू करून संपूर्ण महिनाभर त्यांना सकाळच्या सत्राच्या नावाखाली वेठीस धरायचे, हा दुटप्पी धोरणाचा भाग आहे. विदर्भातील शाळांचे शैक्षणिक वर्ष किमान जुलैच्या पहिल्या आठवड्यापासून सुरू करणे किंवा वातावरण निवेपर्यंत सवलत देणे गरजेचे होते. शिक्षण विभागाने आपल्या या अत्यंत अव्यवहार्य परिपत्रकाचा पुनर्विचार करावा, अन्यथा उन्हाच्या तीव्रतेमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याला काही बरे-वाईट झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सरकारलाच घ्यावी लागेल.

# एक चूक आणि थेट खड्ड्यात!; जालना रोडवरील धोकादायक वास्तव

### जालना रोडवरील बाबा पेट्रोल पंप मार्गावर गटाराचे झाकण तुटले; सुरक्षा व्यवस्थेचा पूर्ण अभाव



**हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी**
**सिद्धेश्वर थोर**

छत्रपती संभाजीनगर, जालना रोडवरील कौटुंबिक न्यायालयासमोर, बाबा पेट्रोल पंपाकडे जाणाऱ्या वर्दळीच्या मार्गावर गटारावरील झाकण तुटून मोठा आणि खोल खड्डा उघडा पडला आहे. मुख्य रस्त्यालगत असलेला हा खड्डा वाहनचालकांसाठी धोकादायक ठरत असून, एखाद्या गंभीर अपघाताला निमंत्रण देत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

या मार्गावर दिवसभर दुचाकी, चारचाकी आणि पादचाऱ्यांची मोठी वर्दळ असते. मात्र खड्ड्याजवळ कोणतेही बॅरिकेड, इशारा फलक किंवा सुरक्षा उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे वाहनचालकांचे क्षणभर जरी लक्ष विचलित झाले, तरी वाहन थेट खड्ड्यात जाऊन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

विशेष म्हणजे हा खड्डा रस्त्याच्या अगदी कडेला असल्याने रात्रीच्या वेळी किंवा पावसाळ्यात त्याचा अंदाज येणे अधिक कठीण होऊ शकते. परिसरातील नागरिकांनी अनेकदा हा प्रश्न उपस्थित केला असला, तरी अद्याप संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली दिसत नाही.

दररोज शेकडो नागरिक या मार्गाचा वापर करतात. अशा परिस्थितीत एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. अपघाताची वाट न पाहता तातडीने गटारावर नवीन झाकण बसवून आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे वर्ष वाचणार; छत्रपती संभाजीनगरमध्ये 16 जूनपासून 10 वी, 12 वीची पुरवणी परीक्षा!

### 5,819 विद्यार्थ्यांसाठी 24 परीक्षा केंद्रे सज्ज; गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी 'झूम' आणि 'सीसीटीव्ही'चा पहारा

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**

इयत्ता १० वी आणि १२ वीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये, यासाठी घेण्यात येणारी पुरवणी यू परीक्षा यंदा १६ जून ते ८ जुलै २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात या परीक्षेसाठी एकूण २४ केंद्रांवर जय्यत तयारी करण्यात आली असून, ५ हजार ८१९ विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत. या परीक्षा अत्यंत सुरळीत आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी आज जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय दक्षता समितीची बैठक पार पडली. या बैठकीला जिल्हा परिषदेच्या मुख्य

> "विद्यार्थ्यांना निर्भय आणि सुदृढ वातावरणात परीक्षा देता यावी यासाठी सर्व संबंधित विभागांनी अत्यंत समन्वयाने काम करावे. कॉपीसारख्या गैरप्रकारांना कोणत्याही परिस्थितीत थारा मिळता कामा नये."
> - विनय गौडा जी.सी. (जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर)

कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. (व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे), माध्यमिक शिक्षणाधिकारी श्रीमती आश्विनी लाठकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, सर्व गटशिक्षणाधिकारी आणि पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**एकूण विद्यार्थी: ५,८१९, एकूण परीक्षा केंद्रे: २४, इयत्ता १० वी: २,९२८ विद्यार्थी (१४ परीक्षा केंद्रे) | कालावधी: १६ ते ३० जून, इयत्ता १२ वी: २,८९१ विद्यार्थी (१० परीक्षा केंद्रे) | कालावधी:** १६ जून ते ८ जुलै

कॉपीबहाद्दरांवर 'झूम' आणि भरारी पथकांचा कडक पहारा असणार असून परीक्षेत कोणत्याही प्रकारचे गैरप्रकार किंवा कॉपी होऊ नये, यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. शिक्षणाधिकारी आश्विनी लाठकर यांनी सांगितले की प्रत्येक परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही (CCTV) यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. 'झूम' (Zoom) तंत्रज्ञानाचा वापर करून मुख्यालयातील नियंत्रण कक्षातून थेट प्रत्येक केंद्रातील हालचालींवर बारीक लक्ष ठेवले जाईल. परीक्षा केंद्रांवर अचानक तपासणी करण्यासाठी विशेष भरारी पथके तैनात करण्यात आली आहेत. केंद्राबाहेर चोख पोलीस बंदोबस्त आणि कडक सुरक्षा व्यवस्था असेल.।मानसिक समुपदेशन आणि सराव सत्रांवर भर देण्यात येणार असून विद्यार्थ्यांना कोणत्याही दडपणाशिवाय आणि तणावमुक्त वातावरणात परीक्षा देता यावी, यासाठी प्रशासनाने विशेष पावले उचलली आहेत. विद्यार्थ्यांची पूर्वतयारी करून घेण्यासाठी विशेष सराव सत्रे (Practice Sessions) घेण्यात आली आहेत, तसेच त्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी मानसिक समुपदेशन (Counseling) देखील करण्यात आले आहे.

# राज्य उत्पादन शुल्काची धडक मोहीम कारवाईत 4लाख 62 हजाराचा मुद्देमाल जप्त

### 66गुन्हे उघड. 65आरोपी अटकेत

**हिंदू प्रकाश वार्ता परभणी प्रतिनिधी**

अवैध मद्यविरोधात परभणी शहरामध्ये गल्लीबोळात तसेच ग्रामीण भागात अवैध मध्याची विक्री होत असल्याने लहान मुलांपासून म्हाताऱ्या वृद्ध पर्यंत मध्याच्या नशेमध्ये गुन्हेगारी वाढत असताना राज्य उत्पादन शुल्कं आयुक्त डॉ राजेश देशमुख तसेच अंमलबजावणी व दक्षता समिती संचालक प्रसाद सुर्वे यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यात अवैध मध्य निर्मिती व विक्री विरोधात विशेष मोहीम किंवा करण्यात आली आहे विभागीय उपायुक्त राज्य उत्पादन शुल्क नांदेड विभागाचे बीएच तडवी तसेच राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक आदित्य पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही धडक कारवाई करण्यात आली.

राजे उत्पादन शुल्क अधीक्षक यांच्या नेतृत्वाखालील 29 मे 2026 ते या कालावधीत जिल्हाभर विशेष मोहीम राबवून अवैध मध्ये व्यवसायावर मोठी कारवाई केली या मोहिमेदरम्यान महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम 1949 अंतर्गत एकूण 66 गुन्हया मध्ये छापे मारून ६५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या कार्यवाहीत तब्बल चार लाख 62 हजार 256 रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे या कार्यवाहीत तीन वाहने जप्त करण्यात आली असून113 .94 ब लीटर देशी दारू16.2ब विदेशी दारू525ब लिटर गावठी हातभट्टी दारू 100b लिटर ताडी तसेच 2800 लिटर रसायन ( हातभट्टी निर्मितीसाठीचे कच्चे साहित्य ) असा मोठ्या प्रमाणावर साठा हस्तगत करण्यात आला आहे हवेत मध्ये व्यवसायांना कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम या कलम 93 पाच प्रतिबंधात्मक प्रस्ताव देखील सादर केले आहेत ही जिल्ह्यात अशाच प्रकारच्या धडक मोहिमा अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे विभागाकडून स्पष्ट करण्यात आले राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक बेटी ढोकरे दुय्यम निरीक्षक अ ब जाधव आर्यन डमरे एमएच पागलवाड बी एल एनजी सोने जे एस माने मोड तसेच जवान एस एस मोगले टी जी राठोड . पांडुरंग घरजाळे आर बी बोईनवाड आर पी साळवे एस टी डहाळे आर सी शेळके आर यू सूर्यवंशी ऋषिकेश साळवे व महिला जवान ऐश्वर्या जे चौधरी वैष्णवी सोळंके ऐश्वर्या होनमाने अपर्णा धापसे जवान वाहन चालक व्हीजी टेकाळे या धडक मोहीम कारवाई मध्ये सहभागी झाले होते तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाने नागरिकांना आव्हान केले आहे की मानवी आरोग्यास घातक ठरू शकणारी अवैध बनावट अथवा पर राज्यातील दारू खरेदी करू नये कुठेही बेकायदेशीर मध्ये निर्मिती अथवा विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यास नागरिकांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या टोल फ्री क्रमांक 18 002339999 व्हाट्सअप क्रमांक 8422001133वर माहिती द्यावी माहिती माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचे विभागाने सांगितले.

# 16-17 जून रोजी जिल्ह्यात 'रिव्हर्स बायर-सेलर मीट'चे आयोजन; एमएसएमई उद्योगांच्या जनजागृतीवर भर

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील निर्यातक्षम उत्पादनांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्याबरोबरच छत्रपती संभाजीनगरला एक अग्रगण्य 'निर्यातक्षम जिल्हा' म्हणून विकसित करण्यासाठी स्थानिक औद्योगिक संघटनांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित 'जिल्हा निर्यात प्रोत्साहन समिती' (DEPC) च्या महत्त्वपूर्ण बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक श्रीमती करुणा खरात, विदेश व्यापार अधिकारी अजय कोरला, तसेच 'मासिया', 'सीएमआयए' (CMIA) आणि विविध औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी, स्थानिक निर्यातदार आणि बँकिंग क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या महत्त्वपूर्ण बैठकीत जिल्ह्यातील निर्यातदारांना येणाऱ्या विविध अडचणी, पायाभूत सुविधा, लॉजिस्टिक, कौशल्य विकास आणि उत्पादनांची गुणवत्ता वाढवणे या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. 'जिल्हा निर्यात केंद्र' (District as Export Hub) उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील विद्यमान आणि संभाव्य निर्यातदारांचा एक अद्ययावत डेटाबेस तयार करून त्यांना आवश्यक ते साहाय्य व प्रशिक्षण देण्याचे नियोजन यावेळी करण्यात आले. तसेच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना (MSME) निर्यात क्षेत्राकडे आकर्षित करण्यासाठी विशेष जनजागृती आणि मार्गदर्शन कार्यक्रम राबवण्याचे कडक निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी प्रशासनाला दिले. जिल्ह्यातील कृषी उत्पादने, ऑटोमोबाईल्स आणि इतर दर्जेदार उत्पादनांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आगामी १६ आणि १७ जून २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात 'रिव्हर्स बायर-सेलर मीट'चे विशेष आयोजन करण्यात आले आहे.

# व्यसन ही सवय नाही, तर तो एक मेंदूचा आजार आहे!" : कुटुंबांनो, धीर सोडू नका, उपचार आणि समुपदेशनाने मिळेल मुक्ती!

व्यसनी व्यक्ती "दारू पिऊन रोज घरात भांडण करतात", "मुलाला मोबाईल आणि अमली पदार्थांचे व्यसन जडले आहे", "अनेक उपाय केले, नवस बोलले, पण काहीच फरक पडत नाही..." ग्रामीण भागापासून ते शहरापर्यंत आज अनेक घरांतून हेच कारुण्यमय आणि हताश करणारे सूर ऐकायला मिळत आहेत. घरात पती किंवा मुलाच्या व्यसनामुळे रोजची भांडणं, मानसिक छळ आणि त्यातून येणारे नैराश्य यामुळे हसतीखेळती कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. मात्र, या सगळ्या अंधारात एक गोष्ट समजून घेणे गरजेचे आहे की, व्यसन ही केवळ एक 'वाईट सवय' नसून तो वैद्यकीयदृष्ट्या 'मेंदूचा एक गंभीर आजार' आहे. योग्य उपचार पद्धती आणि समुपदेशना च्या मदतीने या आजारातून पूर्णपणे बाहेर पडणे शक्य आहे. कौटुंबिक होरपळ आणि नैराश्य व्यसनातून निर्माण होते. व्यसन एका व्यक्तीला जडते, पण त्याचे दुष्परिणाम संपूर्ण कुटुंबाला भोगावे लागतात. रोजच्या भांडणांमुळे घरातील महिला आणि मुलांवर प्रचंड मानसिक ताण येतो. सततच्या छळामुळे घरातील सदस्य नैराश्याच्या (Depression) गर्तेत ढकलले जातात. अनेक कुटुंबे समाजात बदनामी होईल या भीतीने हा त्रास मुकाट्याने सहन करतात. यामुळे घरातील शांतता पूर्णपणे नष्ट होते.

व्यसन सवय नव्हे, मेंदूचा आजार आहे हे आपल्या ला स्वीकारावे लागेल. अनेकदा समाजात व्यसनी व्यक्तीला 'बेवडा, बुगारी' म्हणून हिणवले जाते. मात्र, वैद्यकीय विज्ञानानुसार, जेव्हा एखादी व्यक्ती सतत अंमली पदार्थांचे सेवन करते, तेव्हा त्याच्या मेंदूतील 'डोपामाइन' (Dopamine) या रसायनाचे संतुलन बिघडते. मेंदूची निर्णय घेण्याची आणि स्वतःवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता संपते. म्हणूनच, हा आजार केवळ माणसाला ओरडून किंवा मारून बरा होत नाही.

हा आजार विज्ञानाने बरा होणारा असतानाही, अनेक जण योग्य माहितीअभावी बाबा-बापू, अंगारे-धुपारे किंवा जाहिरातींमधील खोट्या औषधांच्या आहारी जातात. यामुळे रुग्णाची परिस्थिती सुधारण्याऐवजी अधिकच खालावत जाते. केवळ औषध आणून जेवणात चोरून टाकण्याने व्यसन सुटत नाही, तर त्यासाठी रुग्णाचा ताबा आणि मानसिक तयारी करून घेणे गरजेचे असते, जी विज्ञानाशिवाय आणि समुपदेशना शिवाय शक्य नाही. व्यसनमुक्ती ही एका रात्रीत होणारी जादू नाही, तर ती एक टप्प्याटप्प्याने होणारी वैज्ञानिक प्रक्रिया आहे. यामध्ये प्रामुख्याने तीन टप्पे महत्त्वाचे ठरतात.

1) डिटॉक्सिफिकेशन. डॉक्टरांच्या देखरेखीखाली शरीरातील विषारी घटक बाहेर काढणे. 2) समुपदेशन (Counselling). व्यक्तीच्या मानसिक तणावाचा शोध घेणे. 3) पुनर्वसन (Rehabilitation). रुग्णाला पुन्हा मुख्य प्रवाहात आणणे.

व्यसनाधीन व्यक्तीला सकारात्मक पाऊल आणि मदत गरज ची असते.

जर तुमच्याही घरात अशी परिस्थिती असेल, तर आता काळजी करण्याचे कारण नाही. व्यसनाचा सामना करणाऱ्या व्यक्तीला तिरस्काराऐवी उपचारांची गरज असते. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात यासाठी अनेक शासकीय आणि खाजगी व्यसनमुक्ती केंद्र व तज्ज्ञ मानसोपचारतज्ज्ञ उपलब्ध आहेत. योग्य वेळी घेतलेला एक वैज्ञानिक निर्णय तुमच्या कुटुंबाचे गेलेले सुख परत मिळवून देऊ शकतो.

व्यसनमुक्तीच्या प्रवासात संयम आणि योग्य दिशा अत्यंत महत्त्वाची आहे. व्यसनी व्यक्तीला गुन्हेगार न समजता, त्याला आजारी व्यक्ती म्हणून उपचारासाठी पुढे नेणे, हेच कुटुंबाला या संकटातून बाहेर काढू शकते. विज्ञानाची साथ घ्या, तज्ज्ञांचा सल्ला घ्या; कारण 'व्यसनमुक्त कुटुंब' हेच सुखी समाजाचे खरे वैभव आहे!

**नितीन दांडगे,**
**छत्रपती संभाजीनगर**

# 10 ते 16 जून दरम्यान 'नेत्र आजार जनजागृती सप्ताह'; नियमित नेत्र तपासणीचे आवाहन

### नागरिकांनी डोळ्यांच्या आरोग्याबाबत सजग राहावे : मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम

**हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर, राज्य शासनाच्या "माझं गाव आरोग्य संपन्न गाव" अभियानांतर्गत दिनांक १० जून ते १६ जून २०२६ या कालावधीत "नेत्र आजाराबाबत जनजागृती सप्ताह" राबविण्यात येत असून, नागरिकांनी डोळ्यांच्या आरोग्याबाबत सजग राहून नियमित नेत्र तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरच्या मा. मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी केले आहे.

डोळे हे मानवी शरीरातील अत्यंत महत्त्वाचे आणि संवेदनशील अवयव आहेत. मोतीबिंदू, काचबिंदू, मधुमेहामुळे होणारे नेत्रविकार, अपवर्तक दोष तसेच डोळ्यांचे संसर्गजन्य आजार यांचे वेळेत निदान व उपचार झाल्यास दृष्टीदोष आणि अंधत्व मोठ्या प्रमाणात टाळता येऊ शकते. त्यामुळे नेत्र आजारांविषयी जनजागृती आणि नियमित तपासणी यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या जनजागृती सप्ताहादरम्यान गावपातळीवर ग्रामसभा, शाळांमधील आरोग्य शिक्षण उपक्रम, आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत जनजागृती, नेत्र तपासणीसाठी प्रोत्साहन तसेच डोळ्यांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये तसेच सर्व ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयांमध्ये आठवड्यातून एकदा नेत्र तपासणी करण्यात येते व जिल्हा रुग्णालयात रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येते.

• विशेषतः मधुमेह व उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्तींनी नियमित नेत्र तपासणी करून घ्यावी.

• मुलांच्या दृष्टीची वेळोवेळी तपासणी करावी.

• डोळ्यांमध्ये लालसरपणा, खाज, वेदना, पाणी येणे किंवा दृष्टी धूसर होणे अशी लक्षणे दिसून आल्यास तात्काळ वैद्यकीय सल्ला घ्यावा.

• डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही आय ड्रॉप्स अथवा औषधे वापरू नयेत.

**नेत्र आजार टाळण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाय :**

• दिवसातून अनेक वेळा स्वच्छ पाण्याने डोळे धुवावेत.

• डोळ्यांना घाणेरड्या हातांनी स्पर्श करणे किंवा चोळणे टाळावे.

• रुमाल, टॉवेल, डोळ्यांचा मेकअप यांसारख्या वैयक्तिक वस्तू इतरांसोबत वापरू नयेत.

• वाचन, संगणक किंवा मोबाईलचा वापर करताना योग्य अंतर व पुरेसा प्रकाश असावा.

• स्क्रीनचा दीर्घकाळ वापर करत असल्यास 20-20-20 नियम पाळावा. (दर २० मिनिटांनी २० सेकंदांसाठी २० फूट दूर पाहावे.)

• धूळ, धूर, रसायने किंवा तीव्र सूर्यप्रकाशात काम करताना संरक्षक चष्म्याचा वापर करावा.

• हिरव्या पालेभाज्या, गाजर, पपई, संत्री, अंडी व व्हिटॅमिन 'अ'युक्त पदार्थांचा आहारात समावेश करावा.

• मधुमेह व उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्तींनी नियमित नेत्र तपासणी करून घ्यावी.

• मुलांच्या डोळ्यांची वेळोवेळी तपासणी करून दृष्टीदोष आढळल्यास त्वरित उपचार घ्यावेत.

• डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही आय ड्रॉप्स किंवा औषधे वापरू नयेत.

• डोळे लाल होणे, खाज येणे, पाणी येणे, वेदना होणे किंवा दृष्टी धूसर होणे अशी लक्षणे आढळल्यास तात्काळ नेत्रतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. "माझं गाव आरोग्य संपन्न गाव" अभियानाचे उद्दिष्ट केवळ आजारांवर उपचार करणे नसून, प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा आणि व्यापक जनजागृतीच्या माध्यमातून निरोगी समाजाची निर्मिती करणे हे आहे. नागरिकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून स्वतःच्या आणि कुटुंबियांच्या डोळ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागामार्फत करण्यात येत आहे.


दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# फुलंब्रीच्या निरीक्षक दर्जाच्या ठाण्याची धुरा एपीआयकडे; वरिष्ठ निरीक्षक नियंत्रण कक्षात

## प्रथमच कनिष्ठ अधिकाऱ्याकडे प्रभारीपद

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी



**फुलंब्री, :** फुलंब्री पोलिस ठाण्यातील अलीकडील प्रशासकीय बदल्यांमुळे पोलिस विभागासह तालुक्यात चर्चांना उधाण आले आहे. निरीक्षक दर्जाचे असलेल्या फुलंब्री पोलिस ठाण्याचा प्रभारी कारभार सहायक पोलिस निरीक्षक (एपीआय) प्रताप नवघरे यांच्याकडे सोपविण्यात आला असून, तत्कालीन पोलिस निरीक्षक संजय सहाणे यांची नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्याला नियंत्रण कक्षात पाठवून कनिष्ठ अधिकाऱ्याकडे ठाण्याची धुरा देण्यात आल्याने या निर्णयाची विशेष चर्चा सुरू आहे.

**फुलंब्री पोलिस ठाण्यातील नियुक्तीनंतर जिल्ह्यातील बदली प्रक्रियेची चर्चा पुन्हा रंगली आहे. स्थानिक गुन्हे शाखेसह काही विभागांमध्ये अनेक कर्मचारी वर्षानुवर्षे कार्यरत असल्याचे बोलले जात असून, नियमानुसार कालावधी पूर्ण होऊनही त्यांच्या बदल्या झालेल्या नसल्याची चर्चा आहे. त्यामुळे बदली प्रक्रियेत समान निकष आणि पारदर्शकता राखली जाते का, असा प्रश्न उपस्थित केला जात असून आगामी वार्षिक बदल्यांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी १३ मे रोजी केलेल्या बदल्यांमध्ये हा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार फुलंब्रीचे पोलिस निरीक्षक संजय सहाणे यांची नियंत्रण कक्षात नियुक्ती करण्यात आली, तर नियंत्रण कक्षात कार्यरत असलेले सहायक पोलिस निरीक्षक प्रताप नवघरे यांच्याकडे फुलंब्री पोलिस ठाण्याचा प्रभार देण्यात आला.

फुलंब्री हे ग्रामीण भागातील महत्त्वाचे आणि निरीक्षक दर्जाचे पोलिस ठाणे मानले जाते. अशा ठिकाणी प्रथमच एपीआय दर्जाच्या अधिकाऱ्याकडे प्रभारीपद सोपविण्यात आल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे या नियुक्तीमागील कारणांबाबत पोलिस विभागात विविध तर्कवितर्क व्यक्त होत आहेत. काहींच्या मते हा केवळ प्रशासकीय निर्णय आहे, तर काही जण या बदल्याकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहत आहेत. विशेष म्हणजे, वरिष्ठ अधिकाऱ्याची नियंत्रण कक्षात नियुक्ती आणि त्याचवेळी कनिष्ठ अधिकाऱ्याकडे महत्त्वाच्या ठाण्याचा कारभार सोपविण्यात आल्याने या निर्णयाकडे पोलिस दलातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे. मात्र, याबाबत वरिष्ठ पातळीवरून कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण समोर आलेले नाही.

# किशोरवयीन मुलांच्या पालकत्वातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विशेष मार्गदर्शन

**छत्रपती संभाजीनगर, दि. 9 (प्रतिनिधी) :** आजच्या बदलत्या सामाजिक वातावरणात किशोरवयीन मुलांच्या वागणुकीत, विचारांमध्ये आणि पालकांशी असलेल्या नातेसंबंधांमध्ये अनेक बदल होत आहेत. या बदलत्या परिस्थितीत पालकांना योग्य मार्गदर्शन मिळावे आणि किशोरवयीन मुलांना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेता यावे. विविध मुद्दे घेऊन इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स आणि पेडियाट्रिक असोसिएशन छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने मोहीम हाती घेण्यात आली "किशोरवयीन पालकत्व बदलत्या जगातील बदलते नाते" या विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शनिवार, १३ जून रोजी दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत, तापडिया नाट्यमंदिर, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. किशोरवयीन मुलांच्या पालकत्वातील आव्हानांना सजगपणे सामोरे जाण्याचा आणि पालक-मुलांमधील नाते अधिक दृढ करण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून केला जाणार आहे.

या कार्यक्रमात प्रख्यात तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. यामध्ये डॉ. नंदू मुलमुले (ज्येष्ठ मनोविकार तज्ज्ञ, नांदेड), डॉ. शिरीषा साठे (ज्येष्ठ सायकोलॉजिस्ट व कौन्सेलर, पुणे), डॉ. शिल्पा मनसबदार (बालमनोविशेषज्ञ, सिडनी -ऑस्ट्रेलिया) यांचा समावेश आहेत.

# प्रयोगशाळा सहाय्यक विष्णू वाघ सेवानिवृत्त



हिन्दू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**अजिंठा :** शासकीय विज्ञान संस्था, छत्रपती संभाजीनगर येथे प्रयोगशाळा सहाय्यक पदावर कार्यरत असलेले विष्णू किसन वाघ हे नियम वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले. तब्बल ३५ वर्षे ६ महिन्यांच्या प्रदीर्घ आणि उल्लेखनीय सेवेनंतर त्यांनी आपल्या शासकीय कारकिर्दीचा यशस्वी समारोप केला. या निमित्ताने शासकीय विज्ञान संस्थेत आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात त्यांचा सेवामुक्ती व सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. संस्थेचे संचालक डॉ. आर. ए. सातपुते यांच्या हस्ते विष्णू किसन वाघ यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व देऊन सन्मान करण्यात आला.

विष्णू वाघ यांनी आपल्या सेवाकाळात प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि शिस्तबद्ध कार्यपद्धतीच्या जोरावर संस्थेच्या प्रगतीत मोलाचे योगदान दिले. प्रयोगशाळेतील विविध जबाबदाऱ्या त्यांनी अत्यंत कुशलतेने पार पाडल्या. विद्यार्थ्यांना व संशोधकांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी नेहमीच तत्परता दाखवली.

यावेळी बोलताना डॉ. आर. ए. सातपुते यांनी वाघ यांच्या दीर्घ सेवाकाळातील योगदानाचा गौरव करताना सांगितले की, "विष्णू वाघ यांनी आपल्या कार्यातून संस्थेची सेवा अत्यंत निष्ठेने केली असून त्यांचे योगदान संस्थेसाठी कायम स्मरणात राहील."

# सुरेखाबाई शिंदे यांचे निधन



सोयगाव,दि.९ जून : तालुक्यातील जरंडी येथील सुरेखाबाई शेनफडू शिंदे( वय-५६)यांचे सोमवारी (दि.८)सकाळी साडे सहा वाजता निधन झाले.दुपारी दोन वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात एक मुलगा,एक मुलगी,सुना,नातवंडे असा परिवार होता.हॉटेल व्यावसायिक विष्णू शिंदे यांच्या त्या आई होत.

# प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाच्या विशेष मोहिमेत 2,637 गर्भवतींची तपासणी

## 10 वर्षपूर्तीनिमित्त विशेष प्रसूतीपूर्व तपासणी शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान (PMSMA) च्या १० वर्षपूर्तीनिमित्त जिल्ह्यात राबविण्यात आलेली विशेष मोहीम यशस्वी ठरली असून या अंतर्गत जिल्ह्यातील विविध आरोग्य संस्थांमध्ये एकूण २ हजार ६३७ गर्भवती मातांची प्रसूतीपूर्व तपासणी करण्यात आली. यामध्ये ७७१ महिलांची स्त्रीरोग तज्ज्ञांकडून विशेष तपासणी करण्यात आली.

प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानांतर्गत "PMSMA Special Campaign-2026" चे आयोजन जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये करण्यात आले होते. या मोहिमेदरम्यान गर्भवती महिलांच्या आरोग्य तपासण्या, आवश्यक चाचण्या, समुपदेशन व मार्गदर्शन करण्यात आले.

तपासणीदरम्यान ४०८ उच्च जोखीम (हाय-रिस्क) गर्भधारणा असलेल्या महिलांची ओळख पटली. या सर्व महिलांना आवश्यक औषधोपचार, वैद्यकीय सल्ला तसेच गरजेनुसार उच्चस्तरीय आरोग्य संस्थांकडे संदर्भित करण्यात आले.

जिल्हा रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथेही मोठ्या प्रमाणावर गर्भवती मातांची तपासणी करून त्यांना सुरक्षित मातृत्वाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाचा मुख्य उद्देश प्रत्येक गर्भवती महिलेला दर्जेदार प्रसूतीपूर्व आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, उच्च जोखीम गर्भधारणेचे वेळेत निदान करणे आणि माता-बालमृत्यूदरात घट घडवून आणणे हा आहे. दर महिन्याच्या ९ तारखेला आयोजित करण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाचा लाभ घेऊन सर्व गर्भवती महिलांनी नियमित आरोग्य तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

# ऑनलाइन खत विक्रीची सक्ती शिथिल करण्याची आ. सतीश चव्हाण यांची कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे मागणी



**छत्रपती संभाजीनगर:** राज्य शासनाने छत्रपती संभाजीनगर व कोल्हापूर जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर यावर्षीपासून ऑनलाइन फ्रेमवर्क फॉर फर्टीलायझर सेल (खत विक्री अर्ज प्रणाली) ॲपव्दारे खत विक्री अनिवार्य केली आहे. मात्र या नव्या प्रणालीतील जाचक तांत्रिक अटींमुळे शेतकऱ्यांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे ऑनलाइन खत विक्रीची सक्ती तातडीने शिथिल करावी अशी मागणी आ. सतीश चव्हाण यांनी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे केली.

यासंदर्भात चव्हाण यांनी मुंबई येथे मंत्र्यांची भेट घेऊन ऑनलाइन खत विक्रीच्या सक्ती संदर्भात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना येणाऱ्या अडीअडचणी निदर्शनास आणून दिल्या. शासनाने खत विक्रीत पारदर्शकता आणण्यासाठी ही प्रणाली विकसीत केली असली तरी सदर प्रणालीमध्ये अनेक तांत्रिक त्रुटी असल्याने ऐन खरीप हंगामात शेतकऱ्यांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ग्रामीण भागात इंटरनेट कनेक्टिव्हिटीची कमतरता, सर्व्हर वारंवार डाऊन होणे यामुळे शेतकऱ्यांना खत खरेदीसाठी तासन्तास प्रतीक्षा करावी लागत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. तसेच शेतकऱ्यांना तात्काळ खते उपलब्ध होण्याच्या दृष्टीने या वर्षीच्या खरीप हंगामा पुरती खत विक्री ऑफलाइन पध्दतीने सुरू ठेवण्याची मागणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांमधून होत असल्याचे देखील चव्हाण यांनी सांगितले.

# खुलताबाद पोलिसांचा मोठा फौजफाटा रस्त्यावर नाकाबंदी करून अनेक वाहनावर पोलीस निरीक्षक प्रकाश महाजन यांची दंडात्मक कारवाई

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**खुलताबाद :** खुलताबाद वेरूळ महामार्गावरील टी पॉइंट येथे वाहनधारकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे पावले उचलत खुलताबाद पोलिसांनी येथे अचानक नाकाबंदी करत अनेक टू व्हीलर व फोर व्हीलर वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वांधारकावर मोठी कारवाई केली. या ठिकाणाहून वेरूळ म्हैसमाळ फुलंब्री खुलताबाद कडे जाणाऱ्या येणाऱ्या लहान मोठ्या वाहनाची नेहमी मोठी वर्दळ असते

खुलताबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रकाश महाजन पोलीस पथकाने वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्या वाहन धाराकावर मोठी कारवाई करून इ-चलान'द्वारे दंडात्मक कारवाईचा दणका देण्यात आला. या मोहिमेत फॅन्सी नंबर प्लेट असणारी वाहने, विना लायसन्स फिरणारे चालक आणि सीट बेल्ट न वापरणाऱ्यांवर व किरकस आवाज यांच्यावर विशेष कारवाई करण्यात आली. भर उन्हात स्वतः रस्त्यावर उतरून प्रत्येक वाहनाची बारकाईने तपासणी करणारे नव्यानेच काही दिवसापूर्वी रुजू झालेले कर्तव्यदक्ष खुलताबादचे पोलीस निरीक्षक प्रकाश महाजन यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल बोडखे यांचे नेतृत्वाखालील पातखाने

वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी शेख जाकिरभाई राहुल दांडगे, शेख कलीम, फिरोज उत्तम खटके आणि अंबादास पावणे यांच्यासह पोलीस पथकाने खुलताबाद वेरूळ टी-पॉईंटवर बॅरिकेड्स लावून चोख बंदोबस्त ठेवला होता. पोलिसांच्या या अचानक झालेल्या ॲक्शन प्लॅनमुळे बेशिस्त वाहनधारकांने वाहतुकीचे नियमाचे पालन करून पोलीस प्रशासनास सहकार्य करावे असे खुलताबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रकाश महाजन यांनी केले

# ऑनलाईन खत बुकिंग प्रक्रियेतील अडचणी दूर करण्याची मागणी; जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांचे निवेदन

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी



**सोयगाव,दि.९ जून :** सोयगाव तालुक्यासह ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना ऑनलाईन ॲपद्वारे खत बुकिंग करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.विशेषतः लघु व अल्पभूधारक शेतकरी तसेच कृषी केंद्र चालकांना तांत्रिक त्रुटींमुळे खत उपलब्ध होण्यात अडथळे निर्माण होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई प्रकाश काळे यांनी छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी विनय गौडा,निवासी उपजिल्हाधिकारी तथा अपर दंडाधिकारी विधाते साहेब,सिल्लोड-सोयगाव उपविभागीय अधिकारी निलेश आपार,जिल्हा कृषी सहायक प्रमोद पाटील व जिल्हा कृषी अधीक्षक दिपक गवळी यांना निवेदन सादर केले.

निवेदनात ऑनलाईन खत बुकिंग प्रक्रियेमधील त्रुटी तातडीने दूर करून शेतकऱ्यांना सहज व सुरळीतपणे खत उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर खतांचा पुरेसा साठा उपलब्ध करून शेतकऱ्यांची गैरसोय टाळावी,अशी मागणीही करण्यात आली.

याबाबत माहिती देताना जिल्हा कृषी सहायक प्रमोद पाटील यांनी मलकापूर येथूनही खताच्या रॅकचे नियोजन करण्यात येत असून,लवकरच खत पुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे सांगितले. यावेळी तेजस्विनीताई काळे या उपस्थित होत्या.

शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई प्रकाश काळे यांच्या या मागणीमुळे खत पुरवठ्याचा प्रश्न लवकर मार्गी लागेल, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

# एमजीएमच्या श्वेता शर्मा यांना पीएच.डी. प्रदान



हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर, महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन अँड फॉरेन लँग्वेजेसच्या हिंदी विभागातील संशोधक श्वेता दिनेश शर्मा यांना नुकतीच पीएच.डी. प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी हिंदी विभागातील प्रा.डॉ.शहनाज बासमेह यांच्या मार्गदर्शनात 'हिंदी के समकालीन उपन्यासो मे महानगरीय जीवन . ममता कालिया के उपन्यासो के विशेष संदर्भ मे' या विषयावर आपला शोधप्रबंध सादर केला आहे.

या यशाबद्दल मोमना खातून शब्बीर अहमद यांचे विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, परीक्षा नियंत्रक डॉ.हरिरंग शिंदे, सामाजिकशास्त्रे व मानव्यविद्या शाखेच्या अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके, संचालक प्रो. के.पी. सिंह आदींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# 'दर महिन्याला एक उपवास' अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद; आचार्य प्रसन्न सागरजींना 'युगप्रधान तप चक्रवर्ती' उपाधी

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर, अंतर्मना आचार्य श्री १०८ प्रसन्न सागरजी महाराज यांच्या सान्निध्यात रविवारी नवकार गार्डन येथे आयोजित 'दर महिन्याला एक उपवास' हा कार्यक्रम श्रद्धा, भक्ती आणि साधनेचा अनोखा संगम ठरला. यावेळी दिगंबर बीसपंथी समाज, कुशलगड यांच्या वतीने आचार्यश्रींना प्रशस्तिपत्र प्रदान करून 'युगप्रधान तप चक्रवर्ती' या मानाच्या उपाधीने गौरविण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात भव्य शोभायात्रेने झाली. नगरातील प्रमुख मार्गांवरून निघालेल्या या शोभायात्रेत श्रद्धाळूंनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. उपाधीचे प्रशस्तिवाचन पतंजली योगपीठाचे मीडिया प्रभारी एस. के. तिजारावाला यांनी केले. कार्यक्रमात आचार्यश्रींच्या मासिक पत्रिकेसह विशेष प्रकाशनाचे लोकार्पणही करण्यात आले.

धर्मसभेत मुनिश्री सामायिक सागरजी महाराज यांनी ध्यान व योगाचे महत्त्व सांगत निरोगी जीवनासाठी नियमित साधनेचे आवाहन केले. आचार्य प्रसन्न सागरजी महाराज यांनी उपस्थितांना दर महिन्याला किमान एक दिवस उपवास करण्याचा, सात्त्विक जीवनशैली स्वीकारण्याचा व समाजात सदाचार-संस्कारांचा प्रसार करण्याचा संकल्प करण्याचे आवाहन केले.

एस. के. तिजारावाला यांनी 'दर महिन्याला एक उपवास' हे अभियान निरोगी व जागरूक समाज घडविणारे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. कार्यक्रमात विक्रमा कनेरिया यांच्या बासरीवादनाने, बाबा सत्यनारायण मौर्य यांच्या कवितांनी तसेच गायक विजय चौहान यांच्या भजनांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमास विविध सामाजिक, धार्मिक व सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने श्रद्धाळू उपस्थित होते. अशी माहिती प्रचार-प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली.

# परभणी हिंगोली विधान परिषदेच्या निवडणुकीततिरंगी लढतीमध्ये चुरस

## डॉ. नावंदर महायुतीचे सईद खान यांची भेटीगाठीवर भर




हिंदू प्रकाश वार्ता परभणी प्रतिनिधी

परभणी हिंगोली विधान परिषदेची निवडणूक प्रचाराला जोरदार सुरुवात झाली असून महायुतीच्या महाविकास आघाडी व अपक्षाकडून भेटीगाठीतच टोकन दिले जात असल्याची चर्चा रंगत आहे. या निवडणुकी मध्ये राष्ट्रवादीचे आमदार राजेश विटेकर गंगाखेडचे आमदार रत्नाकर गुट्टे वसमत चे आमदार राजू नवघरे यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे रणनीती अद्याप पर्यंत स्पष्ट न झाल्याने निवडणुका त्यांच्यात होती फिरत असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. परभणी हिंगोली विधान परिषदेची जागा राष्ट्रवादीला सोडून घेण्याचा प्रयत्न आमदार राजेश विटेकर यांनी केला त्यांच्या प्रयत्नाला साथ देत आमदार रत्नाकर गुट्टे यांनी दिली प्रयत्नाची पराकष्टा केली. विधान परिषदेत सर्वाधिक 132 मतदार हे राष्ट्रवादीचे असल्याने महायुतीच्या उमेदवाराला राष्ट्रवादीच्या मदतीशिवाय विजय मिळविणे अवघड जाणार आहे आमदार गुट्टी यांच्याकडे सुद्धा जवळपास 30 मतदान आहे अंदाजे 162 मतदान आहे उमेदवार सईद खान विधानपरिषद निवडणुकीत काट्यांची टक्कर झाली होती त्यावेळी सईदखान यांनी महायुतीचा धर्म पाळला नव्हता. ही आठवण राष्ट्रवादी विसरणार आहे का? या बाबतीत राजकीय वर्तुळात चर्चेला उधान आले आहे भाजपा शिवसेना यांच्या गणितावर सहिद खान यांना निवडणूक लढवणे अवघड जाईल डॉक्टर विवेक नावंदर यांच्या विरोधात कॉंग्रेसचे माजी आमदार सुरेश देशमुख यांचे चिरंजीव सुशील देशमुख यांनी उमेदवारी अर्ज महाविकास आघाडीत फूट पडली आहे यामध्ये मतदार कमी असताना कॉंग्रेस व बोभाटा शिवसेना वेगवेगळे लढत असल्याने भाव मात्र तगडा वधारावा लागणार आहे अशा चर्चा रंगत आहेत आत्ता निवडणुकीला थोडा थोडा रंग चढत आहे मताचं समीकरण कसे जुळवायचे याकरिता तिने उमेदवाराची कसोटी लागत आहे.

# मंत्री गुलाबराव पाटील यांनी राजीनामा द्यावा : विकास गायकवाड

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**फुलंब्री, :** केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी जलजीवन मिशन योजनेअंतर्गत ग्रामीण भागात शुद्ध पिण्याचे पाणी पोहोचविण्याचे स्वप्न दाखविले जात असताना, फुलंब्री तालुक्यातील वाघोळा व पोफळा गावांमध्ये मात्र या योजनेच्या कामांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. निकृष्ट दर्जाची पाईपलाईन, दर्जाहीन बांधकामे आणि अद्यापही कायम असलेली पाणीटंचाई यामुळे संतप्त ग्रामस्थांनी आता थेट जलसमाधी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

वाघोळा येथे झालेल्या विशेष ग्रामसभेत ग्रामस्थांनी जलजीवन मिशनअंतर्गत करण्यात आलेल्या कामांचा तीव्र निषेध नोंदविला. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, अनेक ठिकाणी टाकण्यात आलेले पाईप हाताने दाबताच तडकत किंवा फुटत आहेत. कोट्यवधी रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या पाण्याच्या टाक्यांच्या गुणवत्तेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. वाघोळा व पोफळा या दोन्ही गावांतील परिस्थिती सारखीच असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे.

ग्रामसभेत सर्वानुमते ठराव मंजूर करून शासनाकडे संपूर्ण पाईपलाईन बदलण्याची व नवीन पाण्याच्या टाक्या उभारण्याची मागणी करण्यात आली. अन्यथा १५ जून रोजी जातेगाव सिंचन तलाव येथे दोन्ही गावांतील ग्रामस्थ सामूहिक जलसमाधी आंदोलन छेडतील, असा इशारा देण्यात आला.




यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती फुलंब्रीचे माजी संचालक विकास पाटील गायकवाड यांनी प्रशासन व शासनावर जोरदार टीका केली. "सुमारे २५ वर्षांपूर्वी भारत निर्माण योजनेअंतर्गत राबविण्यात आलेली पाणीपुरवठा योजना निकृष्ट कामांमुळे अपयशी ठरली. त्या चुकीची शिक्षा आजही गावातील माता-भगिनी डोक्यावर पाणी वाहून भोगत आहेत. आता जलजीवन मिशनमध्येही त्याच चुका होत असतील तर हा केवळ निष्काळजीपणा नसून ग्रामीण जनतेशी केलेला विश्वासघात आहे," असे ते म्हणाले.

चौकट विकास गायकवाड म्हणाले...

"योजना यशस्वी झाली की श्रेय मंत्री घेतात; मग योजना अपयशी ठरली, भ्रष्टाचार व निकृष्ट कामांमुळे जनतेचे नुकसान झाले तर त्याची नैतिक जबाबदारीही मंत्र्यांनी स्वीकारली पाहिजे. त्यामुळे या प्रकरणात पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा. माझे आरोप चुकीचे असल्याचे कोणी म्हणत असेल तर शासन, मंत्री, संबंधित अधिकारी आणि ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत संयुक्त पाहणी करावी. त्यातून दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल."

ही समस्या केवळ वाघोळा-पोफळापुरती मर्यादित नसून ग्रामीण भागातील अनेक पाणीपुरवठा योजना निकृष्ट कामांमुळे निष्प्रभ ठरल्याचा आरोपही त्यांनी केला. काही अधिकारी, ठेकेदार आणि स्थानिक राजकीय हस्तक्षेपामुळे शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या योजना कागदावर यशस्वी दाखविल्या जात असल्या तरी प्रत्यक्षात नागरिकांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, जलजीवन मिशनसारख्या महत्त्वाकांक्षी योजनेतील कथित त्रुटींमुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये असंतोष वाढत असून, शासनाने तातडीने या प्रकरणाची दखल घेऊन उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# सर्वाधिक काळ पंतप्रधान पदावर राहणारे नरेंद्र मोदी हे देशातील पहिले नेते

## आज रोजी पंतप्रधान मोदी यांचे या पदावरचे आपले 4,399 दिवस पूर्ण







मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911